

कोल्ही आणि सारिका

रादुगा प्रकाशन
मॉस्को

रशियन लोककथा

पुन्हा कथन: अ. तोल्स्तोय

चित्रे: ये. राचोव

अनुवाद: अनिल हवालदार





सारिकेने झाडावर घरटे बांधले, त्यात अंडी घातली, त्यांना उबवून पिलांना जन्म दिला. कोल्हीला जेव्हा हे समजले, तेव्हा ती झाडापाशी आली व बुंध्यावर शेपूट आपटू लागली.

"मी शेपटीनं झाड तोडीन," कोल्ही म्हणाली, "मग तुला आणि तुझ्या पिलांना खाईन!"

सारिका घाबरली व कोल्हीला विनवू लागली.

"कोल्हीमाते, झाड तोडू नको, माझ्या पिलांना मारू नको! मी तुला समोसे आणि मध खायला देईन!"

"तसं असेल तर झाड तोडणार नाही!"

"चल माझ्याबरोबर मोठ्या रस्त्यावर!"

कोल्ही व सारिका मोठ्या रस्त्यावर गेल्या. सारिका उडत होती, कोल्ही मागून धावत होती.

एक म्हातारी व तिची नात समोशांनी भरलेली करंडी आणि मधाचा खुजा घेऊन येत असलेल्या सारिकेने पाहिले.

कोल्ही लपली, सारिका रस्त्यावरच बसली, ती जणू उडू शकत नाही अशी धावत होती, खाली-वर उड्या मारत होती.


नात आजीला म्हणाली:

"ह्या पक्ष्याला धरूया!"

"आपल्याला जमणार नाही ते काम!"

"जमेल. त्याचा पंख तुटलाय. खूप सुंदर पक्षी आहे."





म्हातारीने व नातीने करंडी व खुजा जमिनीवर ठेवले आणि त्या पक्ष्यामागे धावल्या.

सारिकेने समोसे व मधापासून त्यांना नेले. भरपूर खाऊन कोल्हीचे पोट भरले. उरलेला खाद्यपदार्थ तिने लपवला.

मग सारिका घरट्यात परतली. तेवढ्यात कोल्ही बुंध्यावर शेपूट आपटू लागली.

"मी शेपटीनं झाड तोडीन आणि तुला व पिलांना खाईन!"

"कोल्हीमाते, झाड तोडू नको, पिलांना खाऊ नको, मग तुला बीयर प्यायला देईन."

"लौकर चल! मी खूप चरबी आणि गोड खाल्लंय, मला तहान लागलीय."

पुन्हा सारिका रस्त्यावर उडू लागली व कोल्ही धावू लागली.

एक शेतकरी बीयरचे पिंप घेऊन येत असलेला सारिकेने पाहिले. तिने त्याच्याभोवती खूप घिरट्या मारल्या व सतावले, मग ती घोड्यावर बसली, नंतर पिंपावर आणि पुन्हा घोड्याच्या पाठीवर बसली. शेतकरी चिडला, सारिकेला ठार मारण्याची त्याला इच्छा झाली. शेवटी सारिका पिंपाच्या झाकणावर बसली, शेतकऱ्याने कुऱ्हाडीचा घाव घातला, झाकणाला भोक पडले. सारिका दूर उडाली, शेतकरी पाठी धावला.


बीयर रस्त्यावर वाहू लागली व कोल्ही पोटभर बीयर प्यायली.

सारिका घरट्यात परतली. कोल्ही परत बुंध्यावर शेपटी आपटू लागली:

"सारिके, तू मला खाऊ घातलंस?"

"होय!"

"सारिके, तू मला पिऊ घातलंस?"





"होय."

"आता मला हसव, नाही तर झाड तोडीन आणि सगळ्या पिलांना खाऊन टाकीन."

सारिकेने कोल्हीला खेड्यात नेले, तेथे एक म्हातारी गायीचे दूध काढत होती, जवळच एक म्हातारा वेताचे बूट विणत होता.

सारिका म्हातारीच्या खांद्यावर बसली.

"हलू नको," म्हातारा म्हणाला, "तुझ्या खांद्यावर सारिका बसलीय. मी तिला ठार मारीन." त्याने म्हातारीच्या खांद्यावर तडाखा मारलाय. त्याचा नेम चुकला.

म्हातारी पडली, तिच्या दुधाच्या चरवीला धक्का लागला. मग ती म्हाताऱ्याला रागे भरू लागली.

मूर्ख म्हाताऱ्याला कोल्ही खूप वेळ हसत होती.

सारिका परत स्वतःच्या घरट्यात उडून गेली. मुलांना खाऊ घालू लागली, तोच परत कोल्हीच्या शेपटीचे तडाखे सुरू झाले:

"सारिके, तू मला खाऊ घातलंस?"

"होय."

"मला पिऊ घातलंस?"

"होय."

"मला हसवलंस?"



"होय."

"आता मला घाबरव."

सारिका चिडली व म्हणाली:

"डोळे मिट आणि माझ्या पाठी धाव."

सारिका उडू लागली, ओरडू लागली, कोल्ही मागून धावत होती—पण डोळे उघडत नव्हती.

सारिकेने कोल्हीला थेट शिकाऱ्यांपर्यंत नेले.

"कोल्हे, आता घाबर!"

कोल्हीने डोळे उघडले. समोर कुत्रे पाहताच तिची पाचावर धारण बसली. कुत्रे तिच्या पाठी धावू लागले. जेमतेम स्वतःच्या बिळापर्यंत पोहोचली.

बिळात शिरली, थोडा श्वास घेऊन तिने विचारले:

"डोळयांनो, डोळयांनो, काय करत होतात?"

"कुत्र्यांनी तुला खाऊ नये म्हणून बघत होतो."

"कानांनो, कानांनो, तुम्ही काय करत होतात?"

"कुत्र्यांनी तुला खाऊ नये म्हणून ऐकत होतो."

"पायांनो, पायांनो, तुम्ही काय करत होतात?"





"कुत्र्यांनी तुला खाऊ नये म्हणून धावत होतो."

"शेपटे, तू काय करत होतीस?"

"तुला धावण्यात अडथळा यावा म्हणून मी फांद्यांना, बुंध्यांना वेढे घालत होते."

"तर कुत्र्यांनो, खा माझ्या शेपटीला."

कुत्र्यांनी कोल्हीची शेपूट धरली व तिला बिळातून बाहेर खेचत नेले.



ЛИСА И ДРОЗД

Русская народная сказка

На языке маратхи

THE FOX AND THE THRUSH

A Russian folk tale

In Marathi

सोविएत संघात मुद्रित

ISBN5—05—003020—8